# पाटपन्हाळे शाळेत सायबर सुरक्षा अभियान

## गोगटे जोगळेकरतर्फे राबवला उपक्रम

गुहागर, (वा.) रत्नागिरी जिल्ह्यातील गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या सायबर ऑरिअर क्लब व क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने सायबर सुरक्षा जागरूकता मोहीम कार्यक्रम नुकताच गुहागर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयात उत्साहात पार पडला. गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरीचे प्रा. श्री. जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर ऑरिअर क्लब व क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने सायबर सुरक्षाबाबत जागृत मोहीम न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयात राबवण्यात आली. विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देणे , डिजिटल जागरूक नागरिक बनवणे, ओटीपीबाबत फसवणूक, गेमिंग फ्रॉड, सोशल मीडिया फसवणूक यांसारख्या होणाऱ्या गुन्ह्यांवर आधारित माहिती देणे तसेच विद्यार्थ्यांबरोबर प्रश्नोत्तररुपी संवाद या उद्देशाने सदरची जागरूकता मोहीम राबविण्यात आली.

### प्राध्यापकांनी केले मार्गदर्शन

सायबर ऑरिअर क्लबचे सदस्य वैष्णवी शिरसाट , स्नेहा भिडे , चिन्मय सुर्वे , सचिन राठोड यांनी प्रा. जोगळेकर यांच्या मार्गदर्शनात सायबर गुन्हे टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या सावधगिरी उपायांची माहितीबाबत मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांनी रोजच्या डिजिटल व्यवहारात कोणती काळजी घ्यावी हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमामध्ये सायबर सुरक्षा शपथ व डिजिटल माध्यमातून जबाबदारीने वागण्याची प्रतिज्ञा सादर करण्यात आली.

3

### विद्यार्थ्यांना सायबर जागृतीचे शिक्षण

न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयातर्फे मुख्याध्यापिका एस.एस. चव्हाण यांच्या हस्ते प्रा. जोगळेकर व महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. पाटपन्हाळे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सायबर जागृतीचे शिक्षण मिळणे काळाची गरज आहे असे सांगून सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.